## उपोद्‌घात

31 मार्च 2023 रोजी संपलेल्या वर्षासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151 अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

या अहवालात महाराष्ट्र शासनाचे मुद्रांक व नोंदणी, वित्त आणि गृह (उत्पादन शुल्क) विभाग यांच्या नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम, 1971 च्या तरतुदी अंतर्गत आणि त्या अंतर्गत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक द्वारा जारी लेखापरीक्षा व लेखा नियमन, 2020 वरील नियमनांतर्गत आयोजित लेखापरीक्षणाचे महत्वपूर्ण परिणाम समाविष्ट आहेत. हा अहवाल भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151(2) अंतर्गत राज्य विधानमंडळासमोर सादर केल्या जातो.

या अहवालात नमूद केलेली प्रकरणे ही वर्ष 2022-23 या कालावधीसंबधी चाचणी तपासणी करते वेळी निदर्शनास आलेल्या तसेच पूर्वीच्या वर्षात लक्षात आलेल्या परंतु मागील लेखापरीक्षा अहवालांमध्ये ज्यांचा परामर्श घेणे शक्य झाले नाही, अशा प्रकरणांपैकी आहेत; आवश्यक तेथे, वर्ष 2022-23 नंतरच्या कालावधीशी संबंधित प्रकरणे देखील समाविष्ट करण्यात आली आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी जारी केलेल्या लेखापरीक्षण मानकांच्या अनुरूप लेखापरीक्षण करण्यात आले आहे.

**टीप: मूळ इंग्रजी अहवालावरून अनुवादित: शंका समाधानासाठी कृपया इंग्रजी अहवाल पाहावा.**